# महाराष्ट्र शासन

अति तात्काळ

क्रमांक न्यायिक २०२०/प्र.क्र.५८ / आ-५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
ई. मेल- archana.walzade@nic.in
दिनांक-

प्रति,

उप संचालक आरोग्य सेवा, प्रभारी मंडळ (सर्व)
जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
कार्यकारी वैद्यकीय अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई

विषयः कोवीड-१९ प्रतिबंधनासाठी हायड्रॉक्सी क्लोरोक्वीन (Hydroxychloroquine) चा वापर करण्याबाबत

संदर्भः १) भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद (ICMR) यांच्या दिनांक २२/३/२०२० रोजीच्या मार्गदर्शक सुचना

२) संचालक आरोग्य सेवा, पुणे यांचे पत्र क्र. संआसे/कोरोना/४८७४-९७६, दिनांक २४ मार्च २०२०

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये कोवीड-१९ च्या प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत Hydroxychloroquine या गोळया प्रतिबंधात्मक स्वरुपात देण्यासाठी सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्या विस्तृत स्वरुपात पुनःश्च निर्गमित करण्यात येत आहेत.

(१) **प्रतिबंधात्मक** Hydroxychloroquine **घेण्यासाठी लक्षित वर्गः**

(अ) कोवीड-१९ संशयीत आणि निदान झालेल्या रुग्णांच्या उपचारामध्ये समाविष्ठ डॉक्टर, नर्सेस व इतर कर्मचारी.

(ब) कोवीड-१९ Positive cases च्या घरातील संपर्क आलेल्या सर्व व्यक्ती (घरात राहणारे, काम करणारे इ.)

यामध्ये सर्वेक्षण पथकातील सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांचा समावेश करावा. त्याच प्रमाणे ज्या ठिकाणी कोवीड-१९ चे रुग्ण आहेत अशा भागातील रुग्णालयातील कर्मचारी, अधिकारी, CCC, CHC, DCH मध्ये काम करणारे अधिकारी आणि कर्मचारी यांचा सुध्दा यामध्ये समावेश राहील. या व्यतिरिक्त रुग्णालयातील किंवा क्षेत्रात काम करणारे

जे अधिकारी, कर्मचारी संशयीत किंवा निदान झालेल्या रुग्णाच्या सान्निध्यात येतील त्यांना सुध्दा प्रतिबंधात्मक Hydroxychloroquine चा लाभ मिळणे आवश्यक आहे.

**Hydroxychloroquine देतांना पुढील प्रमाणे काळजी घेणे आवश्यक आहे.**

१. गोळया संबंधित कर्मचारी यांनी स्वेच्छेने घेणे आवश्यक आहे. याबाबत माहिती सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांना देण्यात यावी.

२. ज्या कर्मचाऱ्यांना किंवा सहवासितांना हृदय विकार, उच्चरक्तदाब, मधुमेह इ. आजार असतील अशा कर्मचाऱ्यांना तज्ञ डॉक्टरांच्या सल्याने सदर गोळया देण्यात याव्यात.

३. त्याच प्रमाणे ज्या रुग्णांना हृदयांच्या ठोक्यांच्या नियमतेबाबत त्रास आहे त्यांना सुध्दा तपासूनच प्रतिबंधात्मक गोळया देण्यात याव्यात.

४. औषधीची गुंतागुंत झाल्यास त्याबाबत तात्काळ तपासणी करुन औषधोपचार करण्यात यावा.

५. ज्यांना रेटीनोपॅथी (Retinopathy) किंवा हायपर सेन्सीटिव्हीटी (Hypersensitivity) आहे त्यांना Hydroxychloroquine देण्यात येऊ नये.

६. ज्यांना रक्तासंबंधित आजार आहेत त्यांना वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत तपासून औषधी देण्यात यावी.

## (२) हायड्रॉक्सी क्लोरोक्वीनचा डोस

(१) आरोग्य कर्मचारी
पहिला दिवस : ४०० एमजी - दिवसातून २ वेळा (एकूण ८०० एमजी) जेवणानंतर

दुसरा दिवस ते ७ आठवडे :- आठवडयातून एक वेळ ४०० एमजी जेवणानंतर

(२) कोव्हीड १९ पॉझेटिव्ह केसचे घरातील संपर्क आलेल्या व्यक्ती
पहिला दिवस : ४०० एमजी - दिवसातून २ वेळा (एकूण ८०० एमजी) जेवणानंतर

दुसरा दिवस ते ३ आठवडे - आठवडयातून एक वेळ ४०० एमजी जेवणानंतर

उपरोक्त औषधे १५ वर्षाखालील व्यक्ती आणि Retinopathy, known hypersensitivity to Chloroquine यांना देऊ नये.

## (३) महत्वाच्या सुचना

१. औषधे दिल्यानंतर दुष्परिणामाबाबत काळजी घ्यावी. काही दुष्परिणाम आढळल्यास त्वरीत वैद्यकीय सल्ला घ्यावा.

२. कोव्हीड १९ ची लक्षणे - ताप, खोकला, दम लागणे आढळल्यास त्वरीत रुग्णालयाशी संपर्क साधावा.

३. प्रोटोकॉलनुसार Institutional किंवा Home Quarantine मध्ये असल्यास या कालावधीमध्ये आणि घ्यावयाच्या खबरदारीमध्ये कोणताही फरक पडणार नाही.

४. हे औषध सुरु असले तरीही मार्गदर्शक सुचनानुसार PPE, N ९५, Triple layer mask याचा वापर व इतर संसर्ग प्रतिबंधाचे उपाय सुरु ठेवावेत त्यामध्ये कोणताही बदल करु नये.

(डॉ प्रदीप व्यास)
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

प्रतः

जिल्हाधिकारी, (सर्व)
महानगरपालिका आयुक्त (सर्व)
संचालक आरोग्य सेवा, पुणे
संचालक आरोग्य सेवा, मुंबई
आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई